सत्यमेव जयते

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६००/२६३३३३३०/२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवारांसाठी दिनांक १० डिसेंबर, २०२४ व दिनांक १६ डिसेंबर, २०२४ पासून सुरु होणाऱ्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम बाबत उमेदवारांना सर्वसाधारण सूचना

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि.३०/१०/२०२३ च्या शासन निर्णयानुसार सन २०२४-२५ पासून शासनाच्या सर्वकष धोरणांतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवारांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC)- न्यायिक सेवा (JMFC) राज्यसेवा परीक्षा (State Service), न्यायिक सेवा (JMFC), अभियांत्रिकी सेवा परीक्षा(MES), गट "ब" व "क"(Group B&C) स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम योजना राबविण्यात येतात. सदर योजनेचा लाभ मिळविण्यासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत सामायिक प्रवेश परीक्षा घेण्यात आली आहे. सदर परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला असून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनी विकल्प पोर्टलद्वारे निवड केलेल्या प्रशिक्षण संस्थेमध्ये आपली मूळ कागदपत्रे तपासणी करून प्रवेश प्रक्रिया पूर्ण केलेली आहे. अशा उमेदवारांसाठी दि.१० डिसेंबर, २०२४ व दि.१६ डिसेंबर, २०२४ पासून प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात येत आहेत. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाविषयी खालील सूचना निर्गमित करण्यात येत आहेत. पात्र उमेदवारांनी खालील सूचना काळजीपूर्वक वाचणे अनिवार्य आहे.

१. उमेदवारांना उपरोक्त नमूद परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनेसाठी विकल्प पोर्टलच्या माध्यमातून ज्या प्रशिक्षण संस्थेत प्रवेश मिळाला आहे त्या प्रशिक्षण संस्थेकडे प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत वेळोवेळी संपर्क साधावा.
२. प्रशिक्षण कार्यक्रम बार्टी, पुणे यांनी दिलेल्या विहीत कालावधीमध्ये राबविणे प्रशिक्षण संस्थाना बंधनकारक आहे.
३. सदर प्रशिक्षण कार्यक्रमासाठी उमेदवाराने प्रवेश घेतल्यावर संपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रम पुर्ण करणे बंधनकारक आहे. प्रशिक्षण कालावधी दरम्यान प्रशिक्षण सोडता येणार नाही.
४. प्रशिक्षण योजनेच्या कालावधी दरम्यान कुठेही शासकीय/ निमशासकीय/खाजगी नोकरी करता येणार नाही. तसे आढळल्यास किंवा याबाबत या कार्यालयास काही तक्रार प्राप्त झाल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल व नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
५. उमेदवाराने कागदपत्र पडताळणी दरम्यान सादर केलेले अनुसूचित जातीचे जात प्रमाणपत्र, इतर सर्व आवश्यक कागदपत्रे व सादर केलेली माहिती यामध्ये काही खोटे/तफावत आढळल्यास संबंधित उमेदवाराचा प्रवेश रद्द करण्यात येईल, तसेच दरम्यानच्या काळात घेललेले सर्व लाभ परत करावे लागतील.
६. प्रशिक्षण योजनेच्या कोणत्याही टप्प्यावर प्रशिक्षण सोडायचे असल्यास घेतलले सर्व लाभ, दरम्यानच्या काळात प्रशिक्षण योजनेकरीता झालेला सर्व खर्च डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) संस्थेला परत करावा लागेल. तसे न केल्यास कायदेशीर आणि दंडात्मक कार्यवाही केली जाईल.
७. उमेदवाराने यापुर्वी एमपीएससी/ युपीएससी/ आयबीपीएस/ पोलीस व मिलीटरी भरती पुर्व प्रशिक्षण तसेच अधिछात्रवृत्ती यापैकी कोणत्याही योजनेचा यापूर्वी लाभ घेतला असल्यास सदरच्या उमेदवाराला पुन्हा लाभ घेता येणार नाही. यापूर्वी लाभ घेतल्याचे निदर्शनास आल्यास प्रवेश रद्द होईल. तसेच दरम्यानच्या काळात घेतलेले सर्व लाभ परत करावे लागतील.

८. प्रशिक्षण योजनेच्या कालावधी दरम्यान उमेदवारांकडून कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन होणार नाही. प्रशिक्षण संस्थेतील सर्व नियमांचे व शिस्तीचे पालन करावे लागेल. तसेच प्रशिक्षण कालावधीमध्ये धुम्रपान/अंमली पदार्थांचे सेवन, मद्यपान, उद्धट वर्तन असे कोणतेही गैर प्रकार केल्यास संबंधित उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल व कायदेशीर आणि दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

९. सदर प्रशिक्षण योजनेअंतर्गत पात्र उमेदवारांना विद्यावेतन लाभ मिळण्यासाठी किमान उपस्थिती ७५% असणे बंधनकारक राहील. प्रशिक्षण संस्थेकडून प्रशिक्षण काळात दर महिन्याचे बायोमेट्रिक उपस्थिती पत्रक डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेस प्राप्त झाल्यावर त्याची पडताळणी करून थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे उमेदवारांनी दिलेल्या बँक खात्यावर विद्यावेतनाची रक्कम जमा केली जाईल. प्रत्येक महिन्याची बायोमेट्रिक उपस्थिती किमान ७५% न भरल्यास त्या महिन्याच्या विद्यावेतनास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

१०. शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या आरक्षणानुसार लाभार्थी संख्येच्या प्रमाणात महिला, दिव्यांग, अनाथ व वंचित घटक उमेदवारांकरीता जागा आरक्षित ठेवल्या आहेत.

११. प्रशिक्षण योजनेकरीता निवड झाल्यानंतर उमेदवारांनी प्रशिक्षणासाठी तात्काळ रुजू होणे आवश्यक आहे. जर दिलेल्या तारखेपासून ०७ दिवसाच्या आत उमेदवार रुजू झाले नाही अथवा डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेशी किंवा निवड केलेल्या प्रशिक्षण संस्थेशी रूजू होण्याबाबत संपर्क केला नाही तर त्या जागी निवड यादीतील किंवा प्रतीक्षा यादीतील उमेदवाराची निवड करण्यात येईल.

१२. सदर स्पर्धा प्रशिक्षण कार्यक्रम ऑफलाईन पध्दतीने राबविण्यात येत असुन उमेदवारांनी त्याचा लाभ घेणे बंधनकारक आहे. ऑनलाईन स्वरुपात प्रशिक्षण राबविण्यात येत नाहीत.

१३. योजनेबाबत सर्व अटी व शर्तीबाबत स्टॅप पेपर वर प्रतिज्ञापत्र सादर करणे सर्व विद्यार्थ्यांना/उमेदवारांना बंधनकारक आहे.

१४. डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सविस्तर माहिती http://barti.maharashtra.gov.in संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच योजना बद्दल नवीन माहिती जाणून घेण्यासाठी उमेदवारांनी वेळोवेळी उपरोक्त नमूद संकेतस्थळाला भेट देऊन माहिती घ्यावी.

स्वा.

(सुनिल वारे)

**महासंचालक**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी),पुणे**